**प्रेसनोट दिनांक ०२/०३/२०२४**

# सोलापूर शहरात एका तरूणाकडून, ११.८७० ग्रॅम मेफेड्रोन (एम.डी.) जप्त शहर गुन्हे शाखेची कारवाई.

---

सोलापूर शहरामध्ये, मेफेड्रोन या अंमली पदार्थाचे अवैध विक्रीबाबत माहिती काढत असताना, गुन्हे शाखेकडील **पोसई/अल्फाज शेख** यांना, दि.२८/०२/२०२४ रोजी गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, "देगाव रोड येथील देशमुख-पाटील वस्ती येथे राहणारा इसम नामे- सलिम रशिद शेख हा इसम, त्याचे राहते घराचे परिसरात मेफेड्रोन नावाचे अंमली पदार्थाची विक्री करीत आहे " सदरची बातमी प्राप्त झाल्यानंतर, एन.डी. पी.एस. कायद्यातील तरतुदीप्रमाणे, श्रीमती प्रांजली सोनवणे, मा.सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, सोलापूर शहर यांचे आदेशाप्रमाणे व वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोसई अल्फाज शेख व तपास पथकातील अंमलदार यांनी, देशमुख पाटील वस्ती, देगांव रोड, सोलापूर येथे सापळा रचला असता, मिळालेल्या बातमीप्रमाणे, **इसम नामे- सलिम रशिद शेख, वय-३३ वर्षे, रा.देशमुख-पाटील वस्ती, देगाव रोड, सोलापूर** यास ताब्यात घेतले. त्यानंतर, एन.डी.पी.एस. ॲक्टमधील तरतुदींचे पालन करुन, सदर इसमाची अंगझडती घेतली असता, त्याच्या ताब्यात विक्रीकरिता ठेवलेले **लहान-लहान प्लास्टीकचे २९ पाऊच त्यामध्ये ११ ग्रॅम ८७० मि.ग्रॅम. वजनाचे २९,६७५/- रूपये किंमतीचे मेफेड्रोन हा अंमली पदार्थ मिळून** आल्याने सदरचा अंमली पदार्थ जप्त करुन, पोलीस उपनिरीक्षक अल्फाज शेख यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ११५/२०२४ एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८ (क), २२ (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इसम नामे- सलिम रशिद शेख यास सदर गुन्ह्यात अटक करण्यात आल्यानंतर, त्याने सदरचे मेफेड्रोन हा अंमली पदार्थ मुंबई येथून आणल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि श्रीनाथ महाडिक हे करीत आहेत.

सदरची कामगिरी, मा. एम.राज कुमार, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.सुनिल दोरगे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, सोलापूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उप-निरीक्षक अल्फाज शेख, पोलीस अंमलदार दिलीप किर्दक, बापू साठे, भारत पाटील, सुभाष मुंढे, सैपन सय्यद, सिध्दाराम देशमुख, संजय साळुंखे, सायबर पोलीस ठाणेकडील अविनाश पाटील यांनी केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर**
**यांचे करिता**

Scanned with CamScanner